## सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१
दुरध्वनी क्र. ०२०-२६१२२८४६/४७ commcoop2011@gmail.com dyrcs.indl2018@gmail.com

---

जा.क्र.१६-सआ/मजूर सह.सं.नोंदणी निकष / २४६ /२४ दिनांकः- ११ जुलै २०२४

# -: परिपत्रक :-

विषय :- नियोजित मजूर सहकारी संस्था नोंदणीबाबत

संदर्भ :- सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कडील परिपत्रक क्रमांक जा.क्र.१६-सआ/मजूर सह.सं.नोंदणी निकष /३८ /२४ दिनांक:-०२.०२.२०२४

नियोजित मजूर सहकारी संस्था नोंदणी बाबत सहकार आयुक्तालय , महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक २.२.२०२४ नुसार मुद्दा क्रमांक ४ (१३) " मजूर सहकारी संस्थांच्या नोंदणी करीता काही विशिष्ठ तत्वे ठरवून त्या तत्वावर हुकूम नोंदणी करीता प्रकरणाची छाननी करण्याकरिता व पूर्व परवानगी घेण्याकरिता विभागीय पातळीवर विभागीय सहनिबंधक यांचे अध्यक्षतेखाली गठीत समिती नियुक्त करण्यात आलेली आहे.

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, अस्तित्वात असलेल्या संस्थांना पुरेशी कामे उपलब्ध नसताना नविन संस्थांना मान्यता देण्यांत येत आहे ही बाब विचारात घेता सदर समितीने यापुढे बैठक घेण्यापूर्वी या कार्यालयाची पुर्व परवानगी घ्यावी . या कार्यालयाच्या पूर्व परवानगी शिवाय विभागीय स्तरावर बैठक बोलविण्यांत येऊ नये . तसेच कोणत्याही संस्थेची नोंदणी करण्यांत येऊ नये. सदर सुचनांचे तंतोतंत पालन करण्यांत यावे.

O/C 11/7/2024

दिपक तावरे ( भा.प्र.से )
सहकार आयुक्त व निबंधक ,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत आवश्यकत्या कार्यवाहीसाठी रवाना

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
३) सहाय्यक निबंधक,/उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

प्रत माहितीस्तव रवाना

अध्यक्ष /व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मजूर सहकारी संघ मर्या., ६५६-६५७, लेबर फेडरेशन, बिल्डींग, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे -४११०३७